नगर परिषद,जळगांव (जामोद) जि बुलढाणा

# नगर परिषद कार्यालय जळगांव (जामोद), जि. बुलडाणा

दूरध्वनी क्र. ०७२६६ - २२१४३५ Email id :- mcjalgaonjamod@gmail.com

जा. क्र. 1172 दि. 15/09/2026

जाहीर ई-लिलाव सुचना

जळगाव जामोद नगर परिषद, जि. बुलढाणा

जळगांव जामोद नगर परिषद अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील एकुण 25 टिन पत्राचे दुकाने 03 वर्षोच्या मुदती करीता भाडेपट्टयावर देण्यासाठी जाहिर ऑनलाईन / ई-लिलाव प्रक्रीयेमध्ये ईच्छूक लिलाव धारकांचे सहभागाकरीता तपशील खालीलप्रमाणे आहे.

- ई-लिलावात भाग घेणाऱ्यांनी युजरनेम व पासवर्ड नोंदणी करुन घेणे आवश्यक राहील. तसेच स्वतःचे डिजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट (डी.एस.सी.) वापरणे गरजेचे आहे.
- ई-लिलाव प्रक्रीयेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या लिलावधारकांसाठी www.eauction.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर तपशील उपलब्ध आहे.
- ई-लिलाव फी रक्कम रु. २०००/- (ना परतावा) व अनामत रक्कम रु. २५,०००/- धनाकर्ष (डिमांड ड्राफट) द्वारे भरणा करावी. डीमांड ड्राफट **मुख्याधिकारी, नगर परिषद जळगाव (जामोद)** किंवा **Chief Officer Municipal Council Jalgaon Jamod** या नावाने असावा. तसेच लिलावाच्या अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र संकेतस्थळावर अपलोड करावे व आवश्यक कागदपत्रांची मुळ प्रत नगर परिषद कार्यालयात दिनांक 06/10/2026 पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी.
- आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड, डीमांड ड्राफट व अटी शर्ती मान्य असल्याचे रु. १००/- च्या स्टॅपपेपरवरील प्रतिज्ञापत्र संकेतस्थळावर ऑनलाईन अपलोड करण्याची व नगरपरिषद कार्यालयात सादर करण्याची शेवटची दिनांक 06/10/2026 ही राहील.
- एकापेक्षा जास्त दुकानगाळ्यांसाठी बोली लावायची असल्यास प्रत्येक दुकानगाळ्यांकरीता स्वतंत्र लिलाव फी व अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. प्रत्येक दुकानाच्या बोली करीता कमीत कमी ०३ बोली धारकांचा सहभाग अनिवार्य राहील.
- फक्त दिनांक 06/10/2026 पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त झालेले दस्तऐवजांची च तपासणी करुन पात्र लिलावधारकांना ई-लिलाव प्रक्रीयेमध्ये सहभागी होण्याची अनुमती देण्यात येईल.
- विषयांकीत मिळकती समुहाचा सविस्तर तपशील (जसे नकाशा, क्षेत्रफळ इ.) नगर परिषदेच्या सूचना फलक येथे बघण्या करिता उपलब्ध केला आहे.
- एकुण 25 दुकानांपैकी खालीलप्रमाणे दुकाने शासनाच्या धोरणानुसार आरक्षीत ठेवण्यात येत आहेत आरक्षित दुकानाचा तपशील पुढील प्रमाणे आहे, सदर दुकानाच्या लिलावात भाग घेणे करिता शर्ती व अटी नुसार दस्त ऐवज सादर करावे.

| अ.क्र. | विवरण | दुकान क्र. | दुकान गाळे संख्या |
|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जाती, जमाती,विमुक्त व भटक्या जमाती | 08 | 01 |
| 2 | दिव्यांग | 16 | 01 |
| 3 | बेरोजगार सेवा सहकारी संस्था | 18 व 20 | 02 |

- सदर लिलावांची कार्यवाही नगर परिषद स्थायी निर्देश क्रं. २४ तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम २०२५ चे नियमानुसार करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

कोणताही लिलाव कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा. मुख्याधिकारी यांना आहेत. ई-लिलाव बाबतचा अधिक तपशिल तसेच ई-लिलाव प्रणाली च्या तांत्रिक बार्बीविषयी शंका असल्यास नगर परिषदेचे मिळकत विभागात संपर्क साधावा.

## - जाहिर ई - लिलावाचे वेळापत्रक:-

| तपशील | पासून | पर्यंत |
|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी दिनांक | दि. 21/09/2026 स. 9.00 वा. | 06/10/2026 सायं 5.00 वा. |
| दस्तऐवज अपलोड करण्याची मुदत | दि. 21/09/2026 स. 9.00 वा. | 06/10/2026 सायं 5.00 वा. |
| प्राप्त दस्त / कागदपत्रे तपासणी मुदत | दि. 07/10/2026 | 09/10/2026 |
| ऑनलाईन / लाईव्ह ई- लिलाव बोलीची मुदत खालील तक्ता नुसार | दि. 13/10/2026 | 15/10/2026 |

ऑनलाईन / लाईव्ह ई-लिलाव बोलीची दिनांक व वेळ प्रत्येक दुकानगाळ्या करीता खालीलप्रमाणे राहील

| अ.क्र. | दुकान क्र. | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 13/10/2026 | सकाळी 10.00 ते 11.00 |
| 2 | 2 | 13/10/2026 | सकाळी 11.00 ते 12.00 |
| 3 | 3 | 13/10/2026 | दुपारी 12.00 ते 1.00 |
| 4 | 4 | 13/10/2026 | दुपारी 1.00 ते 2.00 |
| 5 | 5 | 13/10/2026 | दुपारी 2.00 ते 3.00 |
| 6 | 6 | 13/10/2026 | दुपारी 3.00 ते 4.00 |
| 7 | 7 | 13/10/2026 | दुपारी 4.00 ते 5.00 |
| 8 | 8 आरक्षित | 13/10/2026 | सायं. 5.00 ते 6.00 |
| | | | |
| 9 | 9 | 14/10/2026 | सकाळी 10.00 ते 11.00 |
| 10 | 10 | 14/10/2026 | सकाळी 11.00 ते 12.00 |
| 11 | 11 | 14/10/2026 | दुपारी 12.00 ते 1.00 |
| 12 | 12 | 14/10/2026 | दुपारी 1.00 ते 2.00 |
| 13 | 13 | 14/10/2026 | दुपारी 2.00 ते 3.00 |
| 14 | 14 | 14/10/2026 | दुपारी 3.00 ते 4.00 |
| 15 | 15 | 14/10/2026 | दुपारी 4.00 ते 5.00 |
| 16 | 16 आरक्षित | 14/10/2026 | सायं. 5.00 ते 6.00 |
| | | | |
| 17 | 17 | 15/10/2026 | सकाळी 9.00 ते 10.00 |
| 18 | 18 आरक्षित | 15/10/2026 | सकाळी 10.00 ते 11.00 |
| 19 | 19 | 15/10/2026 | सकाळी 11.00 ते 12.00 |
| 20 | 20 आरक्षित | 15/10/2026 | दुपारी 12.00 ते 1.00 |
| 21 | 21 | 15/10/2026 | दुपारी 1.00 ते 2.00 |
| 22 | 22 | 15/10/2026 | दुपारी 2.00 ते 3.00 |
| 23 | 23 | 15/10/2026 | दुपारी 3.00 ते 4.00 |
| 24 | 24 | 15/10/2026 | दुपारी 4.00 ते 5.00 |
| 25 | 25 | 15/10/2026 | सायं. 5.00 ते 6.00 |

नगर परिषद, जळगांव (जामोद) जि. बुलढाणा

मुख्याधिकारी,
नगरपरिषद जळगांव जामोद

Scanned with OKEN Scanner

नगर परिषद, जळगांव (जामोद) ★ जि बुलडाणा ★

# नगर परिषद कार्यालय जळगांव जा, जि.बुलडाणा

## (ई- लिलाव प्रथम वेळ)

जळगांव जामोद नगर परिषद अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील एकुण 25 टिन पत्राचे दुकाने 03 वर्षोंच्या मुदती करीता भाडेपट्टयावर देण्यासाठी जाहिर ऑनलाईन / ई-लिलाव द्वारे आयोजित करीत असून इच्छुक लिलाव धारकांचे सहभागा करीता अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

**प्रस्तावित शर्ती व अटी-**

1. प्रत्येक दुकान स्वतंत्ररित्या ई लिलावाद्वारे उच्चतम बोली बोलणाऱ्यांस देण्यांत येईल. एका इसमास फक्त एकच दुकान घेता येईल.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील दुकान भाडेपट्टयाने 03 वर्षोंच्या मुदती करीता देण्यात येईल.
3. यशस्वी बोलीधारकाने या दुकानगाळयासाठी नगर परिषदेकडे भरलेली अधिमुल्य रक्कम ( बोलीची रक्कम ) नापरतावा असेल. तसेच ई-लिलाव प्रणालीमध्ये ज्या गाळयासाठी लिलाव बोली लावायची आहे त्याच गाळ्याचे लिलावात ऑनलाईन बोली लावता येईल. एकापेक्षा जास्त गाळ्याचे लिलावात बोली लावायची असल्यास त्यानुसार वेगवेगळया गाळयासाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.
4. ई-लिलावात भाग घेण्यासाठी ई-लिलाव फी रक्कम रू. 2000/- (ना परतावा) व अनामत रक्कम रू. 25,000/- चा (डिमांड ड्राफ्ट) DD **Chief Officer Municipal Council Jalgaon Jamod** यांच्या नावाने काढण्यात यावा. त्याची स्कॅन प्रत संकेतस्थळावर अपलोड करून, मूळ प्रत तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड, न.प थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र, अपंग असल्यास अपंगत्वाचे प्रमाणपत्र, अनुसूचीत जाती / जमाती/विमुक्त व भटक्या आरक्षित गाळया करीता जातीचे प्रमाणपत्र , बेरोजगार सेवा सहकारी संस्था प्रमाणपत्र (जेथे जे आरक्षण लागू असेल त्याप्रमाणे ) नगर परिषद जळगांव जामोद मध्ये विहित मुदतीत सादर करावे. सदर कागदत्रे सादर न केल्यास ई लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यास अनुमती दिली जाणार नाही.
5. जो इसम मागील 15 वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे. त्यांना बोली बोलण्यास पात्र समजण्यात येईल.
6. लिलावाच्या दिवशी बोली बोलण्यास पात्र होण्यास इच्छुक नागरीकांनी / दुकानदारांनी ऑनलाईन पध्दतीने बोली बोलण्यापूर्वी रुपये २५,०००/- चा (डिमांड ड्राफ्ट) DD मुख्याधिकारी यांचेकडे सुपूर्द करावे लागेल. त्याशिवाय बोली मध्ये भाग घेता येणार नाही. दुकानदारांना लिलाव केल्या पासून ०३ दिवसाच्या आत ५०% अधिमुल्यांची रक्कम नगर परिषदेकडे जमा करावी लागेल आणि उर्वरीत अधिमुल्यांची ५०% रक्कम पंधरा दिवसांच्या आत नगर परिषदेकडे जमा करावी लागेल. या मुदतीत रक्कम न भरल्यास नगर परिषदेकडे जमा असलेली सर्व रक्कम जप्त करण्यात येईल व गाळा नप कडे जमा करण्यात येईल. नगर परिषदेस अदा केलेले अधिमुल्य (Premium) कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही किंवा त्यावर व्याज देता येणार नाही.
7. ज्या दुकानदरांची बोली कायम करण्यांत येणार नाही अश्या दुकानदरांना लिलावापूर्वी जमा केलेले (डिमांड ड्राफ्ट) DD लिलावाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसानंतर मिळेल.
8. विषयांकीत मिळकतीमधील भाडेपट्टेदार हे भोगवटदार या नात्याने त्यांना हस्तांतरीत केलेला गाळा धारण करतील तसेच दुकानाचे वाटप भाडेपट्टा हा तीन वर्षाच्या कालवधी करीता राहील. भाडेपट्टेधारकास भाडेपट्टा कराराची स्वखर्चाने रीतसर नोंदणी करणे बंधनकारक राहील
9. प्रत्येक दुकानाचे अधिमुल्य हे पांच सदस्यीय समितीने ठरविल्याप्रमाणेच राहील व सदरहू अधिमुल्यावर पुढे बोली बोलता येईल. ज्यांची अधिमुल्यांची बोली सर्वात जास्त असेल त्यांना उक्त दुकाने ही तीन वर्षाच्या मुदतीसाठी

Scanned with OKEN Scanner

भाडेपट्टयाने देण्यांत येईल. तसेच मंजूर लिलाव धारकास नियमानुसार गाळ्याची पुर्ण रक्कम भरणा केल्याशिवाय तसेच नोंदणीकृत करारनामा करून दिल्याशिवाय दुकानगाळ्याचा ताबा मिळणार नाही तसेच गाळ्यापोटी भरलेली कोणतीही रक्कम परत मिळणार नाही.

10. प्रत्येक दुकानाचे मासीक भाडे नियमातील तरतुदीप्रमाणे पांच सदस्यीय समितीने ठरविल्याप्रमाणेच राहील आणि सदर भाड्यावर प्रत्येक वर्षी 15% (पंधरा टक्के) भाडेवाढ आकारण्यात येईल.

11. मासीक भाडयाच्या व्यतिरीक्त नियमाप्रमाणे आकारण्यांत येणारे मालमत्ता कर, शासकिय कर, रोजगार हमी कर इत्यादी मागणी बिलाची वाट न पाहता वित्तीय वर्ष सुरु झाल्यांचे दिनांकापासून 15 दिवसांच्या आंत भरावे लागतील.

12. नगर परिषदेचे मासीक भाडे महिना संपल्यानंतर लगतच्या दुसऱ्या महिन्याच्या १० तारखेच्या आंत नगर परिषदेच्या कार्यालयात भरावे लागतील व त्यांची पावती घ्यावी लागेल. यामध्ये कसूर केल्यास प्रति महिना मासीक भाडे १०% प्रमाणे लेट फि / विलंब शुल्क नुकसान भरपाई म्हणून भाडे अदा करे पर्यंत पट्टेदारास द्यावे लागेल.

13. दुकानाचे मासिक भाडे लागोपाठ तीन (3) महिन्यापावेतो थकील राहिल्यास तसेच विहीत मुदतीच्या आंत नगर परिषदेचे कर इत्यादी न भरल्यास दुकान परत घेण्याचा आणि भाडेपट्टा रद्द करण्याचा तसेच दुकानाचा / भाडेपट्टयाचा फेरहरांस करण्याचा नगर परिषदेला पुर्ण अधिकार राहील.

14. मासीक भाडे अथवा मालमत्ता कर इत्यादी नियमाप्रमाणे नगर परिषदेने ठरवून दिलेल्या विहीत मुदतीत नगर परिषदेकडे जमा न केल्यास आणि कर इत्यादी थकीत झाल्यास महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील तरतुदीप्रमाणे पटटेदारांची कोणतीही मालमत्ता जप्त / टाच करण्याचा पूर्ण अधिकार नगरपरिषदेस राहील.

15. पट्टेदारास दुकानामध्ये परस्पर पोट भाडेकरु ठेवता येणार नाही तसेच मुळ भाडेपट्टा हा पोट भाडेपट्टाधारकास (sub-lease) हस्तांतरीत करावयाचा असल्यास मुळ भाडेपट्टाधारकांनी नगरपरिषदेची मान्यता घेणे आवश्यक राहील. अशा हस्तांतरणच्यावेळी प्रचलित वार्षीक दर विवरणपत्रा नुसार दराच्या किमान ८% इतके एक वेळचे शुल्क म्हणून हस्तांतरण शुल्क (Transfer Fee) आकारण्यात येईल.

16. नगर परिषदेने भाडयावर दिलेले दुकानाच्या भिंतीत / रंगात चर्तुक्षेत्रात किंवा छतास कुठल्याही प्रकाराचा फेरबदल करता येणार नाही. तथापि, दुकानादारांच्या धंदयास पूरक अश्या तात्पुरत्या व्यवस्थेस उदा. आलमारी किंवा दुकाना अंतर्गत सोई इत्यादी न.प. च्या पूर्व परवानगीने करुन घेता येईल.

17. भाडेपट्टाधारकाने या दुकानाचा उपयोग / वापर व्यापारी प्रयोजनासाठी करावयाचा आहे. दुकानात कोणतेही प्रकारचे अवैध धंदे/व्यवसाय करता येणार नाही तसेच स्फोटक द्रव्ये / पदार्थ ठेवता येणार नाही. मांस विक्री किंवा दारु विक्री/ बार इत्यादीसाठी दुकानाचा वापर करता येणार नाही. तथापि बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार परवानगी योग्य असलेल्या उद्योग / व्यवसाय करीता न.प. कडुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

18. दुकानाचे मासीक भाडे भाडेपट्टयाचा कालावधी हे जाहीर लिलावाचे दिनांकापासून गृहीत धरण्यात येईल. मात्र दुकानाचा ताबा हा अधिमुल्यांची पूर्ण रक्कम व पहिल्या वर्षाची भाडयाची रक्कम आगावून भरल्यानंतरच पट्टेदाराकडून भाडेपट्टा लिहून व नोंदवुन झाल्याशिवाय देण्यात येणार नाही. आणि उक्त भाडेपट्टा हा पट्टेदाराकडून आपल्या स्वखर्चाने १ (एक) महिन्यांचे आत लिहून व नोंदवुन द्यावा लागेल.

19. प्रत्येक दुकानासाठी स्वतंत्र इलेक्ट्रीक मीटर घेण्याची आणि दुकाना अंतर्गत इलेक्ट्रीक फिटींग वायरींग इत्यादी करण्याची पूर्ण जबाबदारी पट्टेदाराची राहील. दुकानामध्ये इलेक्ट्रीक मिटर स्वखर्चाने बसविल्यानंतर विजेचे बिल परस्पर भरण्याची जबादारी देखील पट्टेदाराची राहील. विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास त्यास न.प. जबाबदार

Scanned with OKEN Scanner

राहणार नाही. तसेच विद्युत पुरवठ्या करीता स्वतंत्र (D.P.) बसवावे लागल्यास ते दुकानधारकांना सामुहिकरित्या बसवावे लागेल. या करीता खर्च दुकानदारांना करावा लागेल. इतर सहकार्य नगर परिषद करेल.

20. भाडेपट्टयाच्या प्रस्तावित शर्ती व अटी मध्ये अथवा भाडेपट्टयाच्या मुदती व शर्ती व अटी मध्ये फेरबदल करण्याचे पूर्ण अधिकार नगर परिषदेचे राहील.

21. दुकाने क्र. ८, १६, १८ व २० हे आरक्षित ठेवण्यात आली आहेत, या दुकानांसाठी ठरलेल्या शर्ती व अटी उपरोक्त प्रमाणेच असून हर्रासीत संबंधीत लाभार्थी समोर न आल्यास आरक्षित दुकानासाठी खुल्या वर्गातील इच्छुकांना बोली बोलण्यास अनुमती राहील. आरक्षित दुकाना संबंधी जात पडताळणी जातीचे प्रमाणपत्र आणणे आवश्यक राहील. उक्त दुकानचा भाडेपट्टयाचा जाहीर लिलावाप्रमाणे होईल. जर राखीव दुकानासाठी संबंधीत व्यक्ती न आल्यास या दुकानाचा जाहीर हर्रास इतर लोकांसाठी करण्यांत येईल.

22. मा. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद, संचालनालय, मुंबई यांचे क्रं. न.पा.प्र.सं./१६/सर्व नपा/२००४/९४४/कक्ष ७/ दि. २८.१०.२००४ मधील स्थायी निदेश क्र. २४ तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम २०२५ नुसार लिलाव पूर्व अंमलबजावणी कार्यपध्दती या शासन निर्णयानुसार प्रस्तावित करण्यात येत आहे.

23. कोणत्या शर्ती व अटींचे उल्लंघन झाल्यास न.प. ला अस्तित्वातील नियम आणि दि. बॉम्बे प्रिमाईसेस ईवेक्शन ॲक्ट 1955 मधील तरतुदीप्रमाणे दुकान ताब्यात घेण्याचा पूर्ण हक्क मुख्याधिकारी यांना राहील.

24. भाड्याने देण्यात आलेली मिळकत ही हस्तांतरण / तारण / गहाण ठेवता येणार नाही.

25. कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध त्यावर प्रस्थापित करता येणार नाहीत.

26. भाडेपट्टा धारकाने नगरपरिषदेच्या मालमत्तेवर कोणतेही हितसंबंध प्रस्थापित करू नयेत. तसेच ज्या कारणासाठी भाडेपट्टा दिला आहे त्याच कारणासाठी दुकान / गाळयाचा वापर अनुज्ञेय असेल.

27. शासनास तसेच नगरपरिषदेस नियमानुसार देय असलेले सर्व कर विहित वेळेत भाडेपट्टाधारकाने दुकानाचे भाडे भरणे आवश्यक आहे.

28. नगरपरिषदे मार्फत भाडेपटट्याने देण्यात आलेल्या मिळकती शिवाय अतिरिक्त जागेचा वापर अथवा अतिरिक्त बांधकाम करता येणार नाही. अशा प्रकारचा वापर आढळून आल्यास शर्तभंग समजण्यात येऊन, नगरपरिषदेमार्फत तशी नोटीस देऊन सदर मालमत्ता परत घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच भाडेपट्टेदार यांचे व्यवसायामुळे अगर तत्सम कृतीमुळे लगतचे गाळेधारक अगर अन्य नागरीक/पशु यांना अगर पर्यावरणास धोका पोहचणार नाही याची दक्षता घेणेची आहे. जीवित अथवा वित्तहानी झाल्यास, त्याची जबाबदारी संबंधित धारकावर निश्चित करून संपूर्ण नुकसानभरपाई वसूल करण्यात येईल.

29. नगरपरिषदेची पूर्वपरवानगी न घेता वापरात बदल करण्यात आल्यास शर्तभंग, तसेच करारनाम्याचा भंग समजण्यात येऊन भाडेपटट्याने नुतनीकरण रद्द करण्याबाबत नगरपरिषदेने नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

30. जाहीर लिलावाच्या प्रस्तावित शर्ती व अटीमध्ये अथवा दुकानाच्या बाबतीत अथवा कोणत्याही प्रकारचा वाद केव्हाही निर्माण झाल्यास त्या वादामध्ये नगर परिषदेचा निर्णय हा अंतीम राहील आणि तो संबंधीत दुकानदारांवर पूर्णपणे बंधनकारक राहील.

31. सदर जागेचे कोणत्याही कारणाने नुकसान नैसर्गिक आपत्तीखेरीज झाल्यास किंवा केल्यास ही नुकसान भरपाई देणेची जबाबदारी भाडेपट्टाधारकांची राहील. गाळया समोरील मोकळया जागेत पॅसेजमध्ये अतिक्रमण बांधकाम करता येणार नाही.

32. ई-लिलाव मध्ये भाग घेतल्यावर प्रतेक बोली रुपये ३०००/- च्या पटीत मध्ये बोलावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

33. सर्व प्रकारचे सन 2026-27 चे मालमत्ता कर व गाळे भाडे संपूर्ण भरलेल्याच्या पावत्या सोबत जोडणे बंधनकारक आहे.
34. विषयांकीत मिळकतीमध्ये नगर परिषद व शासन यांचे कोणत्याही अधिका-यास चौकशी/तपासणी अगर तत्सम कार्यवाहीस कोणतेही वेळी प्रवेश मुक्त असेल.
35. भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर भाडेपट्टेधारकास त्यांचे कडील गाळा नगरपरिषदेस परत ताब्यात द्यावा लागेल. असा ताबा देतांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई नगरपरिषदे कडून दिली जाणार नाही.
36. विषयांकित मिळकतीमधील गाळयांची भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर मुदत वाढविण्याची बाब ही पुर्णपणे नगरप रिषदेच्या अखत्यारीत राहील. मुदत वाढविण्याचे कोणतेही बंधन नगरपरिषदेवर राहणार नाही. मुदतीबाबतचे सर्व अधिकार नगर परिषदेने राखून ठेवले आहेत.
37. विषयांकित मिळकतीमधील भाडेपट्टेदार यांचे कोणत्याही हितसंबंधाकडून झालेल्या गैरकृत्य तसेच नियमबाह्य कृतीस भाडेपट्टेदार यांनाच जबाबदार धरले जाईल व तत्कालीन परिस्थितीनुसार कारवाईस ते पात्र राहतील.
38. दुकान गाळा भाडेपटटयाने देताना नगर परिषद व भाडेपटटाधारक यांचे दरम्यान इथे नमूद सर्व अटी व शर्ती तसेच न.प. चे सभेने केलेल्या ठरावातील सर्व अटी व शर्ती नमूद करुन त्या मान्य व मंजूर असल्याबाबतचा परिपूर्ण असा लेखी स्वरुपात निबंधक कार्यालयात नोंदणीकृत करारनामा योग्य मूल्याचे स्टॅपपेपरवर तयार करणे आवश्यक राहिल. सदर करारनामा बोली लावल्याचे दिनांकापासून ३० दिवसाचे आत करणे बंधनकारक आहे. सदर स्टॅपपेपरचा संपूर्ण खर्च भाडेपटटेधारकास करावा लागेल.

**वित्तीय अटी-**

1. अधिमुल्याची पूर्ण रक्कम व पहिल्या वर्षाच्या भाडयाची रक्कम आगावू भरल्यानंतरच भाड्याचा ताबा भाडेपट्टेधारकांना देण्यात येईल. नगरपरिषदेस अदा केलेले अधिमुल्य कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही.
2. भाडेपट्टेधारकांनी पुर्ण अधिमुल्य न भरल्यास अथवा भाडे न भरल्यास अथवा करारनाम्यातील अटींचा भंग केल्यास भाडेपट्टा रद्द करण्याचा किंवा संपुष्टात आणण्याचा नगरपरिषदेला केंव्हाही हक्क असेल.
3. भाडेपट्टयाची रक्कम प्रतिवर्षी एकत्रित रकमेच्या १५% प्रमाणे वाढविण्यात येईल.
4. नगरपरिषदेने निश्चित केलेली रक्कम भरून भाडेपट्टेधारकास गाळा हस्तांतरीत करण्यात येईल. सदर हस्तांतरण फी ची रक्कम महाराष्ट्र राज्य नगरपरिषद स्थायी निदेश क्र. २४ तथा महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम २०२५ मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे निश्चित करण्यात येईल.
5. भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर नुतनीकरण करताना मुळ भाडेपट्टाधारकांनी भाडेपट्टयाची संपुर्ण रक्कम अदा केली असली पाहिजे. भाडेपट्टयाची रक्कम संबंधितांनी भरलेली नसेल, अशा प्रकरणांत प्रचलित वार्षिक विवरण दरपत्रकाच्या बाजार मुल्यांच्या अनुषंगाने मालमत्तेच्या होणाऱ्या मुल्यांकनाच्या ८% रक्कम अधिक अधिनियमातील तरतुदीनुसार दरमहा २% इतके व्याजासह आकारणी करण्यात येईल.
6. भाडेपट्टा धारकास त्यांच्या दुकानातील होत असलेल्या व्यवसायाचा विमा काढणे बंधनकारक राहील. उक्त दुकानाचे काही नुकसान झाल्यास त्यांची नुकसान भरपाई भाडेपट्टा धारकाची राहील. त्या संबंधी कोणताही वाद निर्माण करणार नाही. तसेच शासनाने नियमाप्रमाणे पटटेदारास आपला व्यवसायाचा परवाना, लायसन्स टॅक्स इत्यादी काढणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

7. ई-लिलाव मंजूर गाळ्या बाबत काही वाद निर्माण झाल्यास जळगांव जामोद कार्य क्षेत्रातील मा. जळगांव जामोद न्यायालयात दाद मागता येईल इतर कोणत्याही मा. न्यायालयात मागता येणार नाही.
8. सदर ई-लिलाव बाबत या व्यतिरिक्त नियमात बदल किंवा वाढ करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्याधिकारी यांना राखून ठेवले आहेत.

नगर परिषद,जळगांव (जामोद) जि बुलढाणा

मुख्याधिकारी,
नगर परिषद जळगांव जामोद

वरील सर्व अटी शर्ती मला मान्य आहेत.

गाळा क. ---------------- चे ई-लिलावात भाग घेणेसाठी आवश्यक रू. २५,०००/- चा धनाकर्ष सोबत जोडला आहे.

ई- लिलाव धारकांची स्वाक्षरी -

ई- लिलाव धारकांचे नांव -

पत्ता -

दुरध्वनी क्र. –

टिप - वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी करून त्याची एक प्रत ऑनलाईन अपलोड करावी व स्वाक्षरी केलेली मुळ प्रत विहित मुदतीत नगर परिषद कार्यालयात सादर करावी.

Scanned with OKEN Scanner

| दुकान गाळे क्र. | गाळयांचे क्षेत्र | | | अधिमुल्य/अनामत रक्कम रू. (नापरतावा) | अनामत रक्कम भरल्यावर भाडे प्रतिहिना रक्कम रू. | अधिमुल्य रक्कमेवर लिलाव बोली वाढविण्याची कमीत कमी रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| | लांबी मीटरमध्ये | रूंदी मीटरमध्ये | क्षेत्रफळ चौ. मीटर | | | |
| 1 ते 25 | 3.05 | 3.05 | 9.3025 | रू. 2,00,000/- प्रती दुकान | रू. 1700/- | रू. 3,000/- |

एकुण 25 दुकानांपैकी खालीलप्रमाणे दुकाने शासनाच्या धोरणानुसार **आरक्षित ठेवण्यात** येत आहेत. **आरक्षित दुकानांचा** तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विवरण | दुकान क्र. | दुकान गाळे संख्या |
|---|---|---|---|
| | **एकुण दुकान गाळे** | - | **25** |
| 1 | अनुसूचित जाती, जमाती,विमुक्त व भटक्या जमाती | 08 | 01 |
| 2 | दिव्यांग | 16 | 01 |
| 3 | बेरोजगार सेवा सहकारी संस्था | 18 व 20 | 02 |

Scanned with OKEN Scanner